महा मेट्रो

PUNE METRO

## मेट्रो मार्गिकेतील वाहन व्यवस्था सुरळीत चालण्यासाठी मेट्रो तर्फे ट्रॅफिक वॉर्डन व क्यूआरटी टीमचे महत्वपूर्ण योगदान




पुणे , २९ जुलै २०१९: नागरिकांच्या सुरक्षेसाठी मेट्रोने कामाच्या ठिकाणी बॅरिकेड लावले आहेत . यामुळे रस्त्याची रुंदी काही ठिकाणी कमी झाली आहे. अश्या ठिकाणी वाहतूक व्यवस्था सुरळीत चालवण्यासाठी मेट्रोने ट्रॅफिक वॉर्डन नेमले आहेत. हे ट्रॅफिक वॉर्डन वाहतूक पोलीसांना मदत करीत असून त्यामुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यास मदत होत आहे. वाहतूक व्यवस्थेचे नियमन करण्यासाठी पुणे मेट्रोने एसीपी दर्जाचे ४ सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व ९ पोलीस निरीक्षक दर्जाचे सेवा निवृत्त पोलीस निरीक्षक अधिकारी यांना कामावर ठेवले आहे. वाहतूक पोलीसांशी नियमित संवाद साधणे व एकत्रितपणे वाहतूक व्यवस्थेचे नियोजन करणे हे अत्यंत महत्वाचे कार्य हे अधिकारी करत आहेत . पुणे मेट्रोने एकूण २६०

ट्रॅफिक वॉर्डन नियुक्त केले आहेत. हे ट्रॅफिक वॉर्डन सी. एम. ई. चौक, फुगेवाडी चौक, परमहंस चौक, गुजरात कॉलनी चौक, शिवतिर्थ चौक, आठवले चौक, नळ स्टॉप चौक इत्यादी वाहतूक कोंडीच्या ठिकाणी कार्यरत असून वाहतूक पोलीसांना वाहतूक नियमनासाठी मदत करत आहे. या व्यतिरिक्त मेट्रो मार्गिकेतील कुठल्याही प्रकारचा अपघात किंवा रस्ता दुर्घटना ठिकाणी तातडीने मदत पोहचवण्यासाठी जलद कृती दल (Quick Response Team QRT) नियुक्त करण्यात आले आहे.

एका जलद कृतिदलामध्ये १ चारचाकी व चार ट्रॅफिक वॉर्डन असून त्यांच्या जवळ प्रथमोपचार पेटी (फर्स्ट एड) इतर तातडीची मदत पुरवण्याचे सामान देण्यात आले आहे.यामध्ये २) स्ट्रेचर ३) फायर एकत्रित व्हिशर ४) सर्च लाइट ५) काठी ६) लाइट बॅटन ७) लाल व हिरवे रंगाचे झेंडे ८) कौशन टेप ९) नायलॉन दोर सह १०) सायरन ११ ) ऍम्प्लिफायर इत्यादी . साधनांसह कार्यस्थ आहे .

जलद कृती दल मेट्रो मार्गिकेमध्ये होणारे अपघातस्थळी मदत देत असून आतापर्यंत अनेक दुर्घटनाग्रस्त नागरिकांना माहिती देउन नजीकच्या रुग्णालयामध्ये पोहचवून आरोग्य सुविधा दिल्या आहेत. याव्यतिरिक्त अपघातस्थळी पोलिसांना पाचारण करणे हे काम देखील क्यूआरटी दल अत्यंत चांगल्या रीतीने करत आहे. एकूण ३ क्यूआरटी (जलद कृती दल) टीम पुणे मेट्रोने स्थापन केले आहेत. या जलद कृती दलाने आतापर्यंत रिच १ विभागात १८० वेळा, रिच २ विभागात ३१ वेळा, रिच ३ विभागात २६ वेळा अपघात स्थळी तातडीने मदत पोहचवली आहे. याव्यतिरिक्त नागरिकांना मदत करण्यासाठी पुणे मेट्रो टोल फ्री क्रमांकाद्वारे येणाऱ्या सूचना, मेट्रोच्या सहयोग केंद्राद्वारे येणाऱ्या सूचना व त्यांच्या अनुषंगाने जलद कृती दल मदत पोहचवण्याचे काम करत असते. मेट्रोने मोक्याचं १२ ठिकाणी इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड लावले असून त्याद्वारे वाहतूक चिन्हे व संदेश यांचे प्रसारण करण्यात येते. तसेच वाहतूकविषयी सूचना देखील या डिस्प्ले द्वारे वेळोवेळी देण्यात येते. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी व अपघात कमी करण्यासाठी मेट्रोने ट्रॅफिक वॉर्डन , जलद कृती दल, डिस्प्ले बोर्ड, वाहतूक सुरक्षा सप्ताह इ उपक्रम राबविले आहेत


PUNE METRO
PUNE METRO


PUNE METRO